# मेट्रोचे कारशेड अधांतरी!

## एमएमआरडीए म्हणते, ‘काम बंद नाही सुरू आहे... वर्क इन प्रोग्रेस’

लोकमत न्यूज नेटवर्क

**मुंबई :** मुंबईच्या पश्चिम उपनगरात मेट्रो-२ अ आणि मेट्रो-७ चे काम वेगाने सुरू आहे. या मेट्रोचे कारशेड येथेच म्हणजे पश्चिम उपनगरात असणार आहे. मात्र दुसरीकडे उर्वरित मेट्रो म्हणजे मेट्रो-३, मेट्रो-४ अ आणि मेट्रो-६ च्या कारशेडबाबत अद्यापही सुस्पष्ट चित्र नसून, उर्वरित मेट्रोचे कारशेड नक्की कुठे असणार आहे? या प्रश्नावर मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणने मौन साधले आहे.

पर्यावरण अभ्यासक डी. स्टॅलिन यांच्याकडील माहितीनुसार, कांजूर येथील मेट्रो कारशेडचे काम थांबले आहे. पण पिलर बाहेरपर्यंत आले आहेत. शिवाय मेट्रो-६ पूर्ण रखडले. मेट्रो-६ च्या लाईनचे काम ८० टक्के पूर्ण झाले आहे. ट्रॅक टाकायचा राहिला आहे. पण आता मेट्रो कारशेडच उभे राहिले नसल्याने मेट्रो-६ चा खर्च वाया जात आहे. माजी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी जेव्हा मेट्रो-६ साठी याचा विचार केला, तेव्हा मिठागरे विभाग काहीच बोलले नाही.

मिठागरे विभागाने कारशेडच्या जागेवर दावा केला. प्लानमध्ये कारशेड येथेच असल्याने सरकारने दुसरी जागा शोधलेली नाही. कुणीही या जागेवर दावा करीत आहे. मेट्रो-३ बाजूला राहू द्या. मेट्रो- चा हिशेब कोण करणार. बाकीच्या मेट्रोचे कारशेडदेखील येथेच होते. मात्र सगळ्याच मेट्रो रखडल्या आहेत या एका कारणामुळे. उर्वरित मेट्रोची कारशेड कुठे आहेत? याची उत्तरे यंत्रणांनी द्यावीत.

### कारशेडचा तिढा कायम

- पर्यावरण क्षेत्रात कार्यरत असलेले रोहित जोशी यांच्या म्हणण्यानुसार, मेट्रो-३ च्या कारशेडबाबत आजही पुरेशी स्पष्टता नाही. गोरेगाव पहाडी येथेदेखील कारशेड होत नाही, हे सरकारला कळले आहे. कांजूरच्या जागेवर केंद्राने दावा सांगितला आहे. आता राज्यालादेखील येथे काहीच करता येत नाही.
- आजघडीला कांजूर येथील काम थांबले आहे. मेट्रो-६ चे काम सुरु असेपर्यंत या जागेवर दावा करण्यात आला नाही. मेट्रो-३ आली आणि दावा केला गेला. येथे प्राधिकरणची जी पाटी लागली होती त्यावर मेट्रो-४ अ, मेट्रो-६ आणि मेट्रो-३ चे असे एकत्रित कारशेड असणार आहे, असा उल्लेख होता. मात्र आता सगळेच काम थांबले आहे. थोडक्यात मेट्रो कारशेडचा तिढा कायम आहे.

